**नियमित दिवाणी दावा क्र. १६००१२३/२०१४.**

**केदू वि. चंद्रकला.**

**नि. ८३ क्रमशः**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १ अनिता नवनाथ पवार यांचा पुढील सरतपास वकिल श्री. व्ही. ए. घुले यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०१.** मी सदरील प्रकरणात पुराव्याकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **नि.क्र. ८३** लगत आहे. नि. क्रं. ८५ सोबत जनरल मुखत्यार पत्राची प्रत दाखल केली आहे त्यावर माझी सही आहे. मजकूर बरोबर आहे. ती नि. क्रं. ८७ वर आहे. नि. क्रं. ३ सोबत किरकोळ फौजदारी अर्ज ९४/१९९५ निशाणी १ व आदेशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. ती **नि. क्रं. ८८** वर आहे. मौजा बोपाने येथील गट क्रं. १७३, २०७, २०३/१, २१६/१ चा गाव नमुना सातबारा उतारा प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्या अनुक्रमे **नि क्रं. ८९ ते ९२** वर आहे. फेरफार नोंद क्रं. ३११ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. ती **नि.क्रं. ९३** वर आहे. दिनांक ०४/०८/२०१४ रोजी तहसीलदार चांदवड यांना तलाठयामार्फत दिलेला अर्ज तो **नि. क्रं. ९४** वर आहे. निशाणी ६१ सोबत लक्ष्मीबाई शेळके यांचा मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. ते **नि. क्रं. ९५** वर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री. ए. टी. देवरे वकिल याच्या नि. क्रं. ९६ वरील अर्जावरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती

**(एस. एस. छल्लाणी)**

**दि. २३/०७/२०२५.** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चांदवड.**

**<u>प्रतिवादी क्रं. ६ एकतर्फा असल्याने व कोणताही अर्ज नसल्याने उलटतपास काही नाही. उलटतपास प्रतिवादी क्रं. १ ते ५ तर्फे श्री. ए. टी. देवरे वकिल याच्या मार्फत शपथेवर सुरु –</u>**

**०२.** वादी क्रं. १ केदू ठाकरे माझे वडील वादी क्रं. २ लंकाबाई माझी आई आहे. मला मिळकतीबाबत व कुटूंबाबत संपूर्ण माहिती आहे. प्रतिवादी क्रं. ६ अशोक ठाकरे हा माझ्या वडीलांचा पुतण्या व माझा चुलत भाउ लागतो. त्याचे लग्न चंद्रकला हिच्या सोबत झाले व त्याला दोन मुल आहेत. हे मला सांगता येणार नाही की, चंद्रकला व अशोकच्या न्यायालयीन प्रकरणाबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रं. १ चंद्रकला हिने प्रतिवादी क्रं. ६ अशोक यांच्या विरुध्द येवला न्यायालयात प्रकरण क्रं. १५७/१९९३ दाखल केले होते व तो मंजूर झाला होता. मला दावा मिळकतीबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील व प्रतिवादी क्रं. ६ चे वडील रामकृष्ण यांच्यात वाटण्या झालेल्या आहेत. मी त्याबाबत कागदपत्र या प्रकरणात दाखल केलेले नाहीत. मी मिळकतीचे उतारे पाहिले आहेत. मला कोणत्याही गटाचे क्षेत्रफळ सांगता येणार नाही. ज्या मिळकतीबाबत वडीलांनी दावा केलेला आहे त्या मिळकतीचे गट क्रं. १७३, २०३, २१६, २०७ असे आहेत. मला मिळकतीच्या चतुःसिमा सांगता येणार नाही. सर्व गटांवर माझ्या आई–वडीलाचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रं. १७३, २०३/१, २१६/१, २०७ हे सामाईक आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रं. ६ अशोक याने प्रतिवादी क्रं. १ चंद्रकला व तिच्या मुलांना अद्याप पर्यंत वाटप दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रं. १ चंद्रकला सावरगाव येथेच राहते. आम्ही आई वडीलांना चारही मुली आहोत. हे मला माहिती नाही की, प्रतिवादी क्रं. १ चंद्रकला हिने प्रतिवादी क्रं. ६ अशोक याच्याकडून याच प्रकरणात वाटप मागितले आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रं. १ यांनी या प्रकरणातील मिळकती वाटपासाठीच्या उलटदाव्यात सामिल केलेल्या आहेत.

दि. न्या. क. स्तर

**०३.** आमचे मुळ पुरुष माझे आजोबा दगू ठाकरे होते. पुंजा ठाकरे यांना केदू व रामकृष्ण अशी दोन मुले होती. केदू ठाकरे यांचे वारस आम्ही चार मुली व रामकृष्ण याचे वारस प्रतिवादी क्रं. ६ अशोक, दत्तु ठाकरे अशी दोन मुले आहेत. शिवराम ठाकरे माझे वडीलांचे आजोबा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलत आजोबांमध्ये वाटपपत्र झालेले आहेत व त्याप्रमाणे उता–यांवर त्यांची नावे लागलेली आहेत. हे मला सांगता येणार नाही की, प्रतिवादी क्रं. १ ने प्रतिवादी क्रं. ६ विरुध्द दाखल केलेल्या प्रकरणात तिला खावटी मंजूर झाली मात्र प्रतिवादी क्रं. ६ याने ती भरली नाही किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, खावटी भरली नाही म्हणून दिवाणी चौकशी अर्ज क्रं. ९४/१९९५ दाखल केला व त्यात मिळकत जप्त केली होती याबाबत मला व्यक्तीगत माहिती नाही. हे मला माहिती नाही की, खावटीची रक्कम भरली नाही म्हणून प्रतिवादी क्रं. ६ अशोक याची वडीलोपार्जित मिळकत गट क्रं. १८३, १८०, २०३, २०७, २१६ जप्त केल्या होत्या किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, जप्ती आदेशा प्रमाणे फेरफार नोंद क्रं. ३११ झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोंदी विरुध्द माझ्या वडीलांनी उपविभागीय अधिकारी, चांदवड यांच्याकडे अपिल दाखल केले होते. त्या प्रकरणात काय निकाल झाला हे मला सांगता येणार नाही. मी सदर दस्त उपलब्ध झाल्यावर दाखल करु शकते. हे मला सांगता येणार नाही की, जप्ती आदेशाविरुध्द माझ्या वडीलांनी जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले होते किंवा कसे.

**०४.** हे मला सांगता येणार नाही की, दावा मिळकत गट क्रं. २१६/१, २०३/१, १७३, २०७ यांच्या पैकी ०.१८ व पोट खराब ०.२ ही प्रतिवादी क्रं. ६ च्या मालकीची मिळकत होती किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, खावटी प्रकरणात जप्त केलेल्या मिळकती आमच्या एकत्र कुटुंबाच्या सामाईक मिळकती होत्या किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, जप्त केलेली ०.१८ आर जमीन ही केवळ प्रतिवादी क्रं. ६ अशोकचीच होती किंवा कसे. अशोकच्या वडीलोपार्जित मिळकती

त्याच्या पत्नीला व मुलांना मिळाल्यास माझी हरकत नाही. हे मला माहिती नाही की, जप्त केलेली ०.१८ आर जमीन प्रतिवादी क्रं. ६ अशोक याच्याच मालकीची होती म्हणून त्या विरुध्द अपिल दाखल केले नाही व महसूल न्यायालयाचा निर्णयाची प्रत या प्रकरणात दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील व प्रतिवादी क्रं. ६ अशोक याने संगनमत करुन प्रतिवादी क्रं. १ ते ५ विरुध्द दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्रं. ६ ने प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांना हिस्सा दिल्याबाबत मी कागदपत्र पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी प्रतिवादी क्रं. ६ व माझे वडील व आई विरुध्द याप्रकरणात सर्व मिळकती वाटणी करीता उलटदावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

वा. दा. कबूल केले.                                समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.12.09 14:00:26 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर**
न्या.क्र.१, चांदवड

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.12.09 14:00:31 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर**
न्या.क्र.१, चांदवड

**दिनांक – ०९/१२/२०२५**